12:17:29 PM



**निशाणी क्र. ५० लगत**

**पुढील उलटतपास वादीतर्फे सा.क्र.१ यांचा प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एम.एम.भारुका यांच्यामार्फत**

१६. हे खरे आहे की, कमलाकर बोडखे हे सोपानचे चुलते आहे. हे खरे आहे की, विविध कार्यकारी सोसायटी, रेल याच्या निवडणुकीत सदस्य पदाकरीता ते उभे होते. हे खरे आहे की, त्यांच्याविरुध्द मी उभा होतो. हे खरे आहे की, सदरील निवडणुकीत कमलाकर बोडखे यांचा विजय झाला. हे खरे नाही की, तेव्हापासून माझ्यामध्ये व प्रतिवादी यांच्यामध्ये राजकीय हेवेदावे झाले. माझे प्रतिवादीशी राजकीय हेवेदावे नाही.

१७. सन २०१४ मध्ये रेल ग्रामपंचायतचे सरपंच किशोर वाळुंजे होते. ते प्रतिवादी यांचे मामा आहेत. ती त्यांची चुलत बहिण आहेत. तिचे नाव कमलबाई सुदाम बोडखे आहे. सन २०१४ साली उपसरपंच वाल्मिक सवळीराम जाधव होते. भाऊसाहेब थेटे हे ग्रामपंचायतचे सदस्य होते. प्रतिवादी हे २०१४ च्या निवडणुकीत ग्रामपंचायतचे सदस्य किंवा सरपंच पदावर नव्हते. मला हे सांगता येणार नाही की, गावात दोन राजकीय गट आहेत किंवा कसे.

प्रश्न–प्रतिवादीने ग्रामपंचायतकडून स्वतःच्या मालकीच्या मिळकतीवर घर बांधण्याचा परवाना घेवून नियमानुसार बांधकाम पूर्ण केलेले आहे का ?
उत्तर–ग्रामसेवकाने परवान्यात असे लिहले आहे की, न्यायालयात प्रकरण गेले तर परवाना रद्द होईल.

१८. हे खरे आहे की, सोपानने त्याच्या मालकीच्या जागेत बांधकाम केलेले आहे. हे खरे नाही की, बांधकाम पूर्ण झालेले असताना ती बाब

न्यायालयापासून लपवून बांधकाम चालू असल्याचे दाव्यात दर्शवून तुम्ही खोटा दावा दाखल केला. प्रतिवादी याला ग्रामपंचायतीने दिलेली परवानगी रद्द करण्यासाठी मी कोणतीही कायदेशी कार्यवाही केलेली नाही. बांधकाम करत असणा–या मजूरांचे व कारागिरांचे नाव मला सांगता येणार नाही.

प्रश्न– कोणत्या दिवशी बांधकाम सुरु झाले व कोणत्या दिवशी संपले हे तुम्हाला सांगता येईल का

उत्तर–दि.०५.०३.२०१४ रोजी आमचा वाद झाला. त्यादिवशी त्यांनी गड्डे पोखलँडद्वारे खोदले. ते बांधकाम पूर्ण कधी झाले हे मला सांगता येणार नाही.

१९. पोखलँड कोणाचा होता त्याचा नोंदणी क्रमांक काय होता हे मला दिसले नाही. हे खरे आहे की, जागेवर गेलो त्यावेळेस त्याठिकाणी पोखलँड नव्हता. मी ज्यावेळेस तिथे गेलो त्यावेळेस तिथे मजूर नव्हते.

प्रश्न– आता किती फुट रुंदीचा रस्ता अस्तित्वात आहे?

उत्तर– आता रस्ताच नाही.

२०. दाव्यामध्ये रस्ता किती फुट रुंदीचा होता व किती फुट बांधकाम केले याचा उल्लेख का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. किती फुट अरुंद झाला याचे स्पष्ट वर्णन दाव्यात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मागच्या १० वर्षात मी माझ्या शेतात मका, कपाशी, अद्रक अशी पिके घेतले. हे खरे आहे की, पिके घेत असताना मी नांगरणी केली, पेरणी केली, रोटाव्हेटर मारला. मी ती सर्व कामं ट्रॅक्टरने केली. माल तयार झाल्यानंतर त्याची वाहतूक देखील ट्रॅक्टरने केली. हे खरे आहे की, दाव्यातील वादग्रस्त रस्त्यानेच आसपासचे शेतकरी शेतमालाचे वाहतुक ट्रॅक्टरने करतात.

प्रश्न– ग्रामपंचायत मिळकत क्र.२३३ आणि २३४ या हद्दीच्या बाहेर प्रतिवादीने बांधकाम केलेले आहे असे तुमचे म्हणणे आहे का ?

उत्तर– त्यांनी रस्त्यात घर बांधले.

२१. मला ग्रामपंचायत मिळकत क्र.२३३ व २३४ ची हद्द माहिती नाही. हे खरे आहे की, मला त्या मिळकतींची चतुःसिमा माहिती नाही. मी त्याबाबत दावा दाखल करण्यापूर्वी चौकशी केली नाही. मला हे सांगता येणार नाही की, प्रतिवादी याचे बांधकामाचे क्षेत्र किती व बांधकामाची किती क्षेत्र त्याच्या मालकीच्या जागेत आहे.

प्रश्न– दाव्यामध्ये नजरी नकाशा आहे आणि सदरील नजरी नकाशात नियोजीत बांधकाम असे लिहून दर्शविलेले आहे ते नियोजीत बांधकाम कोणाचे आहे व त्याचे नियोजन कोण करते ?

( मात्र, या दाव्यात दुरुस्ती करण्यात आलेली असून वादी स्वतःहून दाव्यात असे म्हणत आहे की, प्रतिवादीने बांधकाम पूर्ण केलेले आहे. त्या अनुषंगाने दाखल सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नजरी नकाशाचा उल्लेख नाही. तसेच सरतपासामध्ये देखील प्रतिवादीने बांधकाम केलेले आहे असे कथन वादीने केलेले आहे. त्यामुळे बदलल्या परिस्थितीमुळे असणा–या परिस्थितीचा विचार करुन प्रश्न विचारणे अपेक्षित आहे. तसेच पुराव्यात काय कथन केलेले आहे याचा विचार करुन प्रश्न विचारने अपेक्षित आहे. त्यामुळे, बदललेल्या परिस्थितीच्या पूर्वीच्या वस्तुस्थितीबाबत प्रश्न विचारणे अपेक्षित नाही. वादकथन आणि सरतपासात बांधकाम पूर्ण झाल्याचा उल्लेख आहे. ही बाब स्पष्ट आहे. त्याची योग्यता वादातील आहे. त्यामुळे, प्रश्न नाकारण्यात येतो.)

प्रश्न– दावा दुरुस्ती केल्यानंतर सुध्दा दाव्यातील नजरी नकाशातील नियोजित बांधकाम तुम्ही लिहलेले आहे
उत्तर– प्रतिवादीने लिहलेले आहे.

२२. बांधकाम कधी सुरु झाले व कधी पूर्ण झाले याचे माझ्याकडे माझ्या तोंडी पुराव्या शिवाय कागदोपत्री पुरावा व तोंडी पुरावा नाही. हे खरे नाही की, दाव्यात चुकीचा नजरी नकाश दर्शविलेला आहे. दाव्यात दुरुस्ती केल्यानंतर बांधकामाबाबत नजरी नकाशात किंवा वाद कथनामध्ये कोणत्याही बांधकाम झालेल्या घराचे सविस्तर

वर्णन का नमूद केलेले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी प्रतिवादीला बांधकाम थांबविण्याची विनंती दि.०५.०३.२०१४ रोजी गावात विनायक वैराळ यांच्यासमक्ष केली होती. आता ते मयत आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त कोणीही हजर नव्हते. माझ्या तोंडी सांगण्याशिवाय माझ्याकडे कोणताही पुरावा नाही.

२३. मला याची माहिती नाही की, प्रतिवादी यांचा कोणाशी वाद विवाद आहे किंवा त्यांच्यावर काही गुन्हे दाखल आहे किंवा कसे. आडदांड म्हणजे हुकूमशाहीसारखे. प्रतिवादी आडदांड वृत्तीचे आहे असे दर्शविणारा माझ्या तोंडी शब्दांशिवाय पुरावा नाही. माझ्यात आणि प्रतिवादीमध्ये त्या दिवशी शिवीगाळ झाली होती. त्यांनी काय शिव्या दिल्या मी सांगू शकत नाही. त्यांनी रस्त्याच्या जागेवर शिव्या दिल्या. दि.०५.०३.२०१४ रोजी शिव्या दिल्या त्यादिवशी मी आणि प्रतिवादी हजर होतो. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही हजर नव्हते.

२४. प्रतिवादी यांनी शिवीगाळ केली याच्याबाबत माझ्या तोंडी पुराव्या व्यतिरिक्त कोणताही पुरावा नाही. हे खरे नाही की, प्रतिवादीचे बांधकाम पूर्ण झालेले असताना प्रतिवादीचे बांधकाम चालू आहे असे खोटे व काल्पनीक नमूद केले. हे खरे नाही की, प्रतिवादी यांना त्रास देण्यासाठी त्यांच्याविरुध्द खोटे अवमान प्रकरण दाखल केले. हे खरे नाही की, मुळ दावा दाखल करण्यपूर्वीच प्रतिवादीचे बांधकाम पूर्ण झालेले होते. हे खरे नाही की, प्रतिवादीने कोणतेही बांधकाम रस्त्यावर केलेले नाही. हे खरे नाही की, केवळ राजकीय हेवेदाव्यातील प्रतिवादीचे बांधकाम पाडून मिळण्यासाठी मी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे खरे नाही की, प्रतिवादीने स्वतःच्या मालकीच्या ताब्यातील जागेमध्ये बांधकाम केलेले आहे. प्रतिवादीच्या बांधकामामुळे माझे नुकसान झाले असे दर्शविणारा पुरावा माझ्याकडे नाही. हे खरे नाही की, मला नुकसान कधी झाले याचे विवरण सांगता येणार नाही. आमचे शेत १० वर्षापासून पडीक आहे आणि त्यामुळे पिकांचे नुकसान झाले.

२५. मी मागील १० वर्षाचे माझ्या शेताचे सातबारे पाहिलेले आहेत. माझ्या म्हणण्याप्रमाणे माझ्या सातबा–यात पिकाच्या झालेल्या मागील १० वर्षातील नोंदी

चूकीच्या आहेत.

प्रश्न– शासनाकडून तुम्हाला वेळोवेळी मिळालेले अनुदान चूकीचे मिळालेले आहे

उत्तर– मला अनुदान मिळालेले नाही.

२६. माझे जिल्हा मध्यवर्ती बँक व वैजापूर मर्चंट बँकेत खाते आहेत. अनुदान औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेत येते. हे खरे नाही की, माझ्या दाव्यात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादीच्या घरासमोरुन जाण्यायेण्याचा वहिवाटीचा रस्ता नव्हता व नाही. हे खरे नाही की, प्रतिवादीने कोणतेही बांधकाम मी दाव्यात नमूद केल्याप्रमाणे रस्त्यावर केले नाही. हे खरे नाही की, मागील ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून घराजवळून चलीत असलेली पांधी जशीच्या तशी आजही अस्तित्वात आहे. हे खरे नाही की, सदरील पांधीच्या रस्त्यावर प्रतिवादीने कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. हे खरे नाही की, प्रतिवादीने त्याच्या मालकीच्या जागेवर रस्त्याकडील बाजूस ११ फुट सोडून बांधकाम केलेले आहे. हे खरे नाही की, ती ११ फुट जागा स्वतःच्या मालकीच्या जागेतून मोकळी सोडलेली आहे.

२७. हे खरे नाही की, प्रतिवादीने त्याच्या मालकीच्या जागेत पूर्व–दक्षिण कोप–यात बोअर वेल घेतलेला आहे. हे खरे नाही की, प्रतिवादीने आम्हाला कधीही शिवीगाळ केली नाही व जिवे मारण्याची धमकी दिली नाही. हे खरे नाही की, प्रतिवादी व आमच्यामध्ये बांधकामसंदर्भात कोणतेही संभाषण झाले नाही. हे खरे नाही की, मी राजकीय हेवादाव्यात खोटा दावा दाखल केला. हे खरे नाही की, खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष दिली.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.08.06 14:55:21 +0530

(वि. द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कन्नड.

कन्नड.
दिनांक : ०६/०८/२०२५
01:36:37 PM

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 06.08.2025 |
| Order signed by the Presiding Officer | 06.08.2025 |
| Order uploaded on | 06.08.2025 |